# महाराष्ट्राचे बदलते राजकारण

**स्वप्नील शंकर पोवार** संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र विभाग शिवाजी विदयापीठ कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

काळानुसार बदल हा राजकीय प्रक्रियेचा भाग आहे पण हा बदल राजकीय नितीमत्तेला तसेच राजकीय विचाराना सोबत घेऊन आहे की त्याला तिलांजली देऊन फक्त सत्ता, पदे आणि आर्थीक राजकारण याना चिकटून आहे. हे याच विचारमंथन होण काळाची गरज आहे.

गेल्या काही दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल झालेले दिसून येतेच अनेक मोठी अंदोलने याच महाराष्ट्रात जन्माला आली. नर्मदा बचाव आंदोलन, आण्णा हजारे भ्रष्टाचार निर्मुलन चळवळ, दलित चळवळ, मराठा आरक्षण आंदोलन , हिंदुत्वादी व पुरोगामी विचारसरणीला बळ देण्याचे काम याच महाराष्ट्रात झाले.

स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय आर्थीक, सामाजिक या सर्वचदृष्टया आघाडीवर राहिलेल्या महाराष्ट्राने गेल्या काही दशकात राजकीय बदलांची सत्तांतरे पाहिलेली दिसून येतात.

**संशोधन समस्या :**

२०१४ साली महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी सत्तेत आली. २०१४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीनंतर महाराष्ट्रातील राजकारणाला वेगळे वळण लागल्याचे दिसून येते. यानंतर २०१९ साली महाराष्ट्रात युती सरकार स्थापन झाले. त्यामध्ये देवेंद्र फडणवीस , उध्दव ठाकरे आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. एकाच पंचवार्षिक निवडणूकीमध्ये ३ मुख्यमंत्री पहायला मिळाले. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकरणामध्ये मोठया प्रमाणात बदल होत असलेचे दिसून येते. त्यामुळे महाराष्ट्राचे बदलते राजकारण हा विषय निवडण्यात आला.

**संशोधनाची उद्दिष्टये** :

- महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाचा सविस्तर अभ्यास करणे.
- महाराष्ट्रातील २०१९च्या बदलत्या राजकारणाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती** :

या संशोधनात मी दुय्यम साधनांचा वापर केला मी न्युज पेपर, शोधनिबंध, जरनल आर्टीकल.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या काळात महाराष्ट्राचे राजकारण विकास आणि समाजकारणाला प्राधान्य देणारे नितीमत्ता जोपासणारे होते. पण नंतरच्या काळात महाराष्ट्राचे राजकारणचा कल बदलत गेला. यासाठी कारणीभूत असणाऱ्या घटना व्यक्ती यांच नाव घ्यावयाचे झाल्यास महाराष्ट्राच्या बदलत्या राजकाराणचा जनक व महाराष्ट्राच्या राजकारणाचा अविभाज्य भाग म्हणजे शरद पवार यांचे नाव अग्रक्रमाने घावे लागेल. बदलत्या राजकारणात राजकीय प्रयोग करण्याचे धाडस शरद पवार यांनी केले.

मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या काळात सरकार मधून बाहेर पडत पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) सरकार स्थापना केली त्यांनी ४० आमदार आपल्या सोबत घेत वयाच्या ३८व्या वर्षी सर्वात महाराष्ट्राचा तरुण मुख्यमंत्री झाले. पुलोद सरकार पडल्यानंतर शरद पवार पुन्हा कॉग्रेसमध्ये समिल झाले. त्यानंतर काही वर्षे महाराष्ट्रात राजकारणाना स्थिरता राहीली. राजीव गांधी यांच्या मृत्यूमुळे काँग्रेसची सर्व सुत्रे सोनिया गांधी यांच्या हाती गेली. त्यामुळे पंतप्रधान पदासाठी प्रबळ मानल्या जाणाऱ्या शरद पवार यांच्या राजकीय महत्वकांक्षेने शरद पवार यांनी काँग्रेसचा अथवा जन्माने भारतीय असलेल्या व्यक्तीला मिळवी अशी भुमिका घेतली. परिणामी शरद पवार यांची पक्षातुन हाकालपट्टी करण्यात आली. त्यांनत शरद पवार यांनी तारिफ अन्वर व पी.ए.संगमा यांस सोबत घेऊन १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. मर्यादित लोकसभा सदस्य व विधानसभा सदस्य असुनही शरद पवार यांनी राज्याच्या राजकारणातील व देशाच्या राजकारणातील महत्वाच्या पदावर काम करत आपले राजकारणातील महत्व टिकवून ठेवले. काँग्रेस सोबत युती करुन १५ वर्षे राज्याची सत्तेत आपल्या हाती ठेवण्याच कौशल्य दाखवले.

राष्ट्रवादी स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्रात राजकीय घडामोडीना वेग आला तो राज ठाकरे यांच्या बंडाने. शिवसेना व आजच १९९५ ला सत्तेत आल्यानंतर हा शिवसेनोचा सुर्वण काळ सुरु झाला होता. या काळत बाळासाहेब ठाकरे यांचा महाराष्ट्रात राजकारण वचक होतो या काळात बाळासाहेब ठाकरे यांना अव्हाण देण्याची धमक मोजक्याच नेतृत्वानी दाखवली. छागन भुजबळ व नारायण राणे या दोघांनी हा राजकीय धोका पत्कारतही आणि नंतर हे नेते महाराष्ट्राच्या राजकारणत टिकून ही राहीले. यांच्या बंडाची व्याप्ती मर्यादित राहीली.

परंतू शिवसेनेच्या वर्चस्वाला धक्का मिळाला तो राज ठाकरे यांच्या बंडाने. एकेकाळ बाळासाहेब ठाकरे यांचे राजकिय वारसदार मानले जाणारे राज ठाकरे २००६ साली शिवसेनेतुन बाहेर पडुन महाराष्ट्रात नवनिर्माण सेना पक्षाची स्थापना केली. या बंडामुळे मराठी अस्मिताला माननारा मतदार वर्गाला मोठा धक्का बसला. बाळासाहेब ठाकरे यांच्या सारखी वक्तृत्वशैली लाभलेल्या

राज ठाकरे यांनी ``मराठी आस्मिता कार्ड ``वापरुन राजकारणा आपला पाया मजबुत केला. सडेतोड वक्तृत्वशैली मुळे राज ठाकरेंनी मराठी अस्मिता असणारा मतदार सुरवातील राज ठाकरे यांच्या कडे वळण्यास चांगले यश मिळाले असे दिसून येते.

मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाने पहिल्याच प्रयत्नात २७ नगरसेवक निवडून आणले व २००९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाचे १३ विधानसभा सदस्य निवडून आणले. मात्र ही यशाची घौडदौड महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाला पुढे राखता आली नाही.

देशात नरेंद्र महाराष्ट्रात देवेंद्र , नरेंद्र मोदी यांचे राजकीय वलय २०१४ साली निर्माण झाले असताना या राजकीय स्थितीचा फायदा महाराष्ट्रातील भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने घेतलेला दिसून येतो. महाराष्ट्रात शिवसेना या पक्षाचा लहान भाऊ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाजप ने या निवडणूीत सत्तेची किल्ली हातात घेतली याच दरम्यान भाजप मधील प्रस्थापित नेत्याना मुख्यमंत्री पदाची स्वप्ने पडू लागली होती. मात्र या प्रस्थापित नेत्यांच्या तुलनेत तरुण आणि नविन असणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री पदावर बसवले.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाची येत्याहा अधिक पार्श्वभूमी बघीतली तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद मराठा नेतृत्वाकडे जास्त झुकलेले दिसून येते पण २०१४ च्या निकालानंतर मोदी-शहा यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या रुपाने ब्राम्हणन जातीतील मुख्यमंत्री करण्याचे धाडस दाखविले. जातीय समिकरणामुळे देवेंद्र फडणवीस यांचे स्थान किती भक्कम राहील याविषयी साशंकता व्यक्त केली जात होत होती. परंतु देवेंद्र फडणवीस यांनी मुत्सदी राजकारणाने महाराष्ट्राचे पाच वर्षे मुख्यमंत्रीपदी राहण्याची किमया सार्थ केली. नंतरच्या काळात फडणवीस यांनी आपल्या पक्षातील आणि पक्षाबाहेरील विरोधकांला थोपवण्याचा प्रयत्न केला. या आठ वर्षाच्या राजकारणात देवेंद्र फणवीस यांनी आपला महाराष्ट्राच्या राजकारणातील पाया मजबुत केला परिणामी भाजपमध्ये देवेंद्र यांची बरोबरी करेल असा नेता महाराष्ट्रात कोणीही नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या नवीन राजकीय पध्दतीमुळे राजकीय पट बदलेला दिसून येतो.

महाराष्ट्राच्या राजकारणात सत्तेत समाविष्ठ होण्यासाठी भापला येथून शिवसेनेची आवश्यकता असायची पण २०१४ नंतर विविध निवडणूका मध्ये भाजपची विजयाची घौडदौड थांबेलेली नाही. त्यामुळे भाजप पक्ष महाराष्ट्रात इतका मजबूत झाला. यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या मुत्सदी व आक्रमक राजकारणाचा मोठा वाटा आहे. वसंतराव नाईक हे सलग १३ वर्षे राज्याचे मुख्यमंत्री होते मात्र १९७२ नंतर कोणत्याही राजकीय नेतृत्वाला सलग पाच वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उपभोगता आले नाही. २०१९ च्या निवडणुकी पर्यंत देवेंद्र फडणवीस यांची तुलना शरद पवार यांच्याशी होऊ लागली. शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणाला न उलगडलेले कोड आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूकीत मर्यादित यश मिळवुनही महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार नावाची एक कल्ट तयार झाली. पण देवेंद्र फणवीस यांनी मुख्यमंत्री विराजमान झाल्यानंतर शरद पवारांच्या राजकीय बलस्थानांना धक्के देण्यास सुरुवात झाली.

वंचित पॅटर्न हा निवडणुकीत महाराष्ट्राने आणि देशातील एक नवा प्रयोग पाहिला. दलित, मुस्लिम, कामगार, भटके विमुक्त यांना एकत्रीत करुन प्रकाश आंबेडकर व एम. आय. एम यांनी आकाराला आणलेली वंचित बहुजन आघाडी . वंचित समाजाला सत्तेत बसविण्यासाठी प्रकाश आंबेडकर यांनी लाखोच्या सभा घेऊन बहुजन समाजाला एकत्र करण्याच्या प्रयत्न केला. याकडे ओबीस वर्ग पण काही प्रमाणात झुकला गेला. या सर्वाना एकत्र करुन २०१९ ची निवडणूक लढवली पण लोकसभा व विधानसभा निवडणूकीत एकही उमेदवार वंचित बहुजन आघाडीचा निवडणून आला नाही. वंचितने मोठया प्रमाणावर मते मिळवली याचा सर्वाधिक फटका राष्ट्रवादी व कॉंग्रेस या पक्षाना बसला.

२०१९ ची विधानसभा निवडणुकी पर्यंत देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची चर्चा माध्यमांमध्ये होती. कोणत्याही क्षणी सत्ता पलट करण्याची क्षमता देवेंद्र फणवीस यांच्याकडे होती. अशी माध्यमातुन चर्चा होती. यामुळेच देवेंद्र फणवीस हे आत्मविश्वासने **``मी पुन्हा येईन``** अशी भाषा बोलू लागले. **अशाच वेळी फडणवीस यांनी शरद पवारांच्या राजकारणाचा काळ संपला असे देवेंद्र फडणवीस आत्मविश्वासाने बोलू लागले**. याच काळात राष्ट्रवादीचे अनेक नेते राष्ट्रवादी सोडून निघून चालले होत. २०१९ च्या विधानसभा निवडणूक निकाल येईपर्यंत सर्वाना भाजप शिवसेना सत्तेत येईल असेच वाटत होते. शरद पवार यांना टक्कर देईल असा तुल्यबळ नेता आहे असा समज भाजप मधील नेतृत्वाने करुण घेतला. पण २०१९ ते २०१९ या काळात सत्तेतील वाटयावरुन नाराज असलेल्या शिवसेनेचा फारसा विचार कोणी केला नाही. २०१४ ते २०१९ या काळात शिवसेना नेत्यांशी बिलगले तर देवेंद्र फणवीस मातोश्रीवर जाऊन समजुत काढायचे असा शिरसा ठरला होता. शिवसेना नेते खिशात राजीनामे घेऊन फिरणारे नेते अशा मिशकिल टिकात्मक विषय झाल होता.

देवेंद्र फडणवीस हे उध्दव ठाकरेना सहज मॅनेज करु शकतात असे चित्र निर्माण झाले होते. २०१९ चा निकाल लागल्या नंतर शिवसेना नेहमी प्रमाणे सत्तेत सामिल होईल असा गोड गैरसमज भाजप नेतृत्वाचा होता पण विधानसभा निकाल लागल्यानंतर शरद पवार यांनी संजय राऊन यांना हाताशी धरुन उध्दव ठाकरे यांच्या साथीने एक धाडसी **राजकीय प्रयोग** करण्याचा प्रयत्न केला. २०१४ ते २०१९ या काळात भाजप कडून सातत्याने दुय्यम वागणूक मिळाल्याने उध्दव ठाकरे यांच्या मनात खदखद होती. या परिस्थितीच फायदा घेऊन आपल्या वैचारिक दृष्टया पुर्ण विरोधी असलेल्या राष्ट्रवादी व कॉंग्रेस सोबत सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. यामध्ये खासदार संजय राऊत यांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली. यातुनच महाविकास आघाडी उदयास आली. यामध्ये शरद पवार यांची भुमिका महत्वाची ठरली हिंदूत्व विचारसरणी असणाऱ्य पक्षासोबत युती करण्याचा विचार

शरद पवार यांनी सोनीया गांधी यांच्या गळी उतरिवला. राहुल गांधी शिवसेने सोबत येण्यास राजी नव्हते पण महाराष्ट्रातील कॉग्रेस नेत्यानी त्यांचे मन वळवले . तिन्ही पक्षांच्या एकत्रित इच्छाशक्तीमुळे महाविकास आघाडी आकाराला आली. दरम्यानच्या काळात अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे काही आमदार फोडून देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सरकार स्थापन केलं. पण शरद पवार यांनी प्रदीर्घ राजकीय, प्रदीर्घ अनुभव पणाला लाऊन अवघ्या ८० तासात अजित पवार व देवेंद्र फडणवीस सरकार उध्दवस्त केले त्यांनतर महाविकास आघाडी सरकार स्थापन करुन अडिच वर्षे सरकार चालवले. याच दरम्यान कोरोना यासारख महाभयानक संकट आल असताना सर्व जनता भितीच्या छायेत वावरत असताना उध्दव ठाकरेनी सतत फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून राज्यातील जनतेला मायेचा आधार देत पालकत्वाची भूमिका निभावली. याच अडिच वर्षात कोकणला दोन वादळांचा मोठा तडाका बसला. कोकणी माणसाला उभा करण्याचे मोठ चॅलेंज सरकार समोर होत. कोरोना संकट आणि वादळ यासारख नैसर्गिक संकट यामध्ये उध्दव ठाकरे यांनी दोन वर्षे या संकटाचा सामना करत तीतक्याच ताकतीने महाराष्ट्र उभा करण्याचा प्रयत्न केला. तिन्ही पक्षाचे सरकार पडणार अशी चर्चा रंगत असत. पण याकडे दुर्लक्ष करत स्थिर सरकार चालविण्याचा प्रयत्न उध्दव ठाकरे यांनी केला. याच दरम्यान प्रकृती बिघडली पण उध्दव ठाकरे यांनी घरुनच काम करण्याचा प्रयत्न उध्दव ठाकरे करु लागले. अशातच मंत्री व आमदार यांच्याशी संवाद कमी होऊ लागला. भेटी गाठी कमी होऊ लागल्या. पक्षांतर्गत मतभेद वाढू लागले. उध्दव ठाकरे यांच्या भोवती राजकीय जाळे विणण्यात यशस्वी झाले. आणि शिवसेनेतून एकनाथ शिंदे यांनी बंड केले. महाविकास आघाडी सरकार स्थापने पासून भाजपचे नेते सरकार कधी काय पडणार या तारखा सांगत होते. त्यात महाविकास आघाडी नेत्यांना गंभीर आरोपामुळे तुरुंगात जावे लागले. त्यामुळे अडिच वर्षाच्या काळात ठाकरे सरकार अक्षरशा विरोधकांचा मार चुकवून दिवस काढले. मविआला सत्तेतुन खाली खेचण्यासाठी संपुर्ण ताकत पणाला लावण्याचा प्रयत्न भाजपने केला. पण त्यात तग धरुन राहण्याचे काम मविआने केले. यामध्ये राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीला पुरेसे संख्याबळ असूनही पराभव स्विकारावा लागला. हया निवडणूका म्हणजे जनमताचा कौल नसतो. अशी समजुत घालून महाविकास आघाडी पुढील अडिच वर्षे कारभार करेल असे चित्र दिसत असताना एकनाथ शिंदे हे गुप्तपणे शिवसेनेतील आपल्या समर्थक आमदाराना घेऊन रात्री सुरतच्या दिशेन रवाना झाले. एकनाथ शिंदे हे शिवसेनेत काहीसे नाराज असले तरी इतक्या टोक्याची पाऊल उचलतील अशी पुसटशी कल्पना उध्दव ठाकरेनां नव्हती. आठवडाभरात ४० आमदार व अपक्ष १० आमदाराना गळाला लावले. शिंदे हे शिवसेनेतील प्रभावी नेते असले तरीही ते पक्षातील दोन तृतीयंअश आमदार फोडू शकतील याचा विश्वास भापज नेतृत्वला नव्हता. शिंदेच्याकडे पुरेस संख्याबळ आहे हे लक्षात आले नंतर भाजपची या सगळयात एंट्री झाली.

यादरम्यान भाजपने पडदयामगची भूमिका घेतली होती. आता भाजपच सरकार येणार अस भाजप नेत्याला वाटत असताना भाजप वरिष्ठ नेत्यांनी फडणवीस यांना मुख्यमंत्री पदाची खुर्ची न देता एकनाथ शिंदे यांचेकडे दिली. दोन तृतीयअंश आमदार व खासदार फोडून संपुर्ण शिवसेनेत फुट पाडली. पुढे शिवसेना पक्षावर दावा सांगितल. व ठाकरे घराण्याची अस्मिता असलेली शिवसेना पक्ष व त्यांच चिन्ह स्वत:कडे घेण्यासाठी प्रयत्न चालविला. निवडणूक आयोगाच्या निकालाने संपुर्ण शिवसेना पक्ष व पक्षाचे परंपरागत चिन्ह धनुष्यबाण हे एकनाथ शिंदे नी आपल्याकडे हिसकावून घेतले. पुढे शिवसेनेत दोन गट निर्माण झाले. आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या मशाल चिन्ह निवडणूक आयोगाने दिले.

ED, CBI यासरख्या संस्थाच्या चौकशीचा ससेमिरा मागे लावून अनेक नेते भाजपमध्ये प्रवेश करुन घेण्याच सपाटाच लावला. आणि जुलै २०२३ मध्ये अजित पवार आपल्या सोबत महाराष्ट्र विधानसभा ४१ आमदार नागालँड ७ आमदार, झारखंड १ आमदार महाराष्ट्र विधानपरिषद ५ आमदार व राज्यसभा १ खासदार घेऊन भाजप सोबत युती केली. व महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री व अन्य काही मंत्री पदे आपल्याकडे घेतली गेली. राष्ट्रवादी पक्षात अजित पवार गट व राष्ट्रवादी शरद पवार गट निर्माण झाले. शरद पवार यांचा अनुभव व मुत्सदी राजकारणामुळे हा पक्ष शरद पवार यांच्याकडे राहील. अशी अशा होती. पण ती आशा मावळली गेली. आणि निवडणूक आयोगानी राष्ट्रवादी पक्ष व त्यांचे घडयाळ हे चिन्ह अजित पवार गटाला दिले. शरद पवार गटाकडे तुतारी चिन्ह देऊन राष्ट्रवादी शरद पवार गट निर्माण झाला. राष्ट्रवादी पक्षाचे दोन तुकडे होऊन देखील शरद पवार थांबलेले दिसून येत नाहीत. आज ते राजकारणात सक्रीय आहेत. काळाच्या ओघात टिकून राहण्याचे काम शरद पवार करत आहेत.

महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणाचा हेतू बघितला तर अलिकडील या दहा वर्षात ED,CBI या संस्थाना हाताशी धरुन किंवा त्यांची चौकशीची ससेमिरा पाठीमागे लावून दबाव तंत्राचा मोठया प्रमाणात वापर करुन आपली राजकीय महत्वकांक्षा सत्ताधारी पक्ष पुर्ण करताना दिसत आहेत. विचारांच तसेच विकासाच राजकारण कुठतरी बाजुला पडलेल दिसून येत. पक्षाची विचाराधारा व विचाधारेवर चालणारे पक्ष फक्त आर्थिक व राजकीय सत्ता आपल्या हाती ठेवण्याचा पाठपुरवठा करत आहेत. राजकीय नैतिकता बाजुला ठेवली. या महाराष्ट्राच्या बदलत्या राजकारणात दिसून येते.

निष्कर्ष -

२०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २१ ऑक्टोंबर २०१९ रोजी एकाच फेरीत संपूर्ण महाराष्ट्र २८८ जागांसाठी मतदान झाले. या विधानसभा निवडणूकीत एकूण ६१.४ मतदान झाले. या विधानसभा निवडणूक निकाल अंतर्गत २८८ जागापैकी भारतीय जनता पक्षाला १०६ जागा , शिवसेना ५६ जागा, राष्ट्रवादी कॉग्रेस ५३जागा ,कॉग्रेस ४३ जागा, बहुजन विकास आघाडी ३ जागा एमआयएम २जागा, समाजवादी २जागा, भारतीय कम्युनिस्ट पक्ष १जागा, महाराष्ट्र नवनिर्माण १ जागा,स्वाभिमान

पक्ष २जागा, रासप १ जागा अपक्ष १३ जागा कोणत्याही स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते पण भारतीय जनता पक्ष व शिवसेना यांच्या महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले होते परंतु सरकार स्थापनेवरील मतभेदानंतर युती विसर्जीत झाली आणि राजकिय संकट निर्माण झाले कोणत्याही पक्षाला सरकार बनवता न आल्याने राज्यात राष्ट्रपती राजवट लागु करण्यात आली २३ नोव्हेंबर २०१९ च्या पहाटे देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली तथापि या दोघांनी २६ नोव्हेंबर २०१९ रोजी बहुमत चाचणीच्या आधीच राजीनामा दिला आणि २८ नोव्हेंबर २०१९ रोजी शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस,कॉंग्रेस महाविकास आघाडी या नविन युति अंतर्गत मा. उध्दव ठाकरे मुख्यमंत्री म्हणून सरकार स्थापन केले त्यांनतर अडीच वर्षाने एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत फुट पडल्याने उध्दव ठाकरेंना राजीनामा दयावा लागला. त्यानंतर भाजप व शिवसेना एकनाथ शिंदेगट एकत्र येऊन सरकार स्थापन केले मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदेंनी पदभार स्विकारला व उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्विकारला नंतरच्या काळात अजित पवार यांनी राष्ट्रवादी पक्षातील काही आमदार आपल्यासोबत घेत भाजप व शिवसेनेसोबत युति करत सत्तेत समाविष्ट झालेत.

उपाय योजना –

1. महाराष्ट्राचा विकास करणे आवश्यक आहे.
2. स्थिर सरकार असणे आवश्यक आहे.
3. राजकारणाचा पाया वैचारिक व नितिमत्तेला धरुन असावा.

**संदर्भसुची –**

www. constientuency wise result maharashtra Election commisssion of India.com
News paper maharashtra time
The Indian Journal Of Political Science